**भोगवटा प्रमाणपत्र (Occupance Certificate)**

**(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ प्रमाणे)**
**(प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, नियम क्र. ७.७)**

जावक क्र. जमीन/ड/एसआर/२०१९/६२८. दिनांक १८/५/२०१९.

मौजे सावखेडा बु., ता व जि. जळगाव येथील गट नं. १८२/३ मधील भूखंड क्र. २ ते १०, १६ ते २३ व २६ ते ४९/अ (एकूण क्षेत्र ४६८०.१९ चौ.मी.) एकत्रिकरणाची शिफारस सहायक संचालक, नगर रचना, जळगाव यांनी पत्र क्र. ८४४, दि. २२.०३.२००५ अन्वये केलेली आहे. तसेच सदर भुखंडातील एकूण क्षेत्र ४६८०.१९ चौ.मी. वरील बांधकामास सहायक संचालक, नगर रचना, जळगाव यांनी पत्र क्र. २३१५, दि. २५.०९.२०१८ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम मंजुरीची शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे बांधकाम नकाशांना उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांनी आदेश क्र. जमीन/ बांधकाम/ एसआर/२०१८/४०१८, दि. २३.१०.२०१८ अन्वये बांधकाम परवानगी आदेश पारित केलेले आहेत. प्रस्तावातील वास्तुविशारद यांनी दिलेल्या बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्यानुसार गट नं. १८२/३ मधील भुखंड क्र. २ ते १०, १६ ते २३ व २६ ते ४९/अ (एकूण क्षेत्र ४६८०.१९ चौ.मी.) रहिवास वापरास व बांधकाम आराखडयास मंजुरी प्रदान केलेली आहे. अर्जदार यांनी मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण केलेनंतर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

अर्जदार मे. चंद्रा कन्स्ट्रक्शन चे भागीदार श्री. मुकेश शांतीलाल ललवाणी, रा. जळगाव यांनी बांधकाम पुर्ण झाल्याबद्दलचा दि. ०२.०२.२०१९ रोजीचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांचे कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्तावासोबत कन्सल्टींग इंजिनिअर्स /आर्किटेक्चर श्री. पंकज देवरे, रा. जळगाव यांनी सदर मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे विंग A चे बांधकाम पुर्ण झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा यांचे कार्यालयातील सहायक नगर रचनाकार, यांचेकडून दि. २०.०२.२०१९ रोजी १४.०० वाजता बांधकाम तपासणी केलेली आहे. सदर तपासणी वेळी मंजुर नकाशाप्रमाणे जागेवर बांधकाम पुर्ण केले असल्याचे दिसुन आले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**बांधकामाचा तपशील**

पुर्णत्वाचा दाखला / भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिलेल्या रहिवास इमारतीचे बांधकाम क्षेत्र ४६८०.१९ चौ.मी. पैकी विंग A चे बांधकाम पुर्ण झाले असून त्याचे क्षेत्र २५२१.०० चौ.मी. हे या कार्यालयाने मंजूरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशाप्रमाणे केले आहे.

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे इमारतीचे केलेले बांधकाम हे मंजुर नकाशानुसार असल्याने व अर्जदार यांचे विनंतीनुसार वरील बांधकाम तपशीलामध्ये नमुद केलेनुसार इमारतीस भागशः भोगवटा प्रमाणपत्र (Part Occupancy Certificate)_ खालील अटी / शर्तीस अधिन राहुन निर्गमित करणेची शिफास करण्यात येत आहे.

१) स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन, पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरामधील जागा कायम खुली ठेवावी.
२) नियोजन बांधकामा मध्ये मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे झाल्यास किंवा वापर बदलावयाचा झाल्यास या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
३) नियोजित बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीने हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालक यांची राहील.
४) विषयांकित जागेत Rain Water Harvesting व Solar Water System कार्यान्वियत करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

... २ ..

५) सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा यांनी पत्र जा. क्र. २३१५, दि. २५.०९.२०१८ अन्वये मंजुरीची शिफारस केलेल्या पत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

**६) सदर गट नं. १८२/३ मधील भूखंड क्र. २ ते १०, १६ ते २३ व २६ ते ४९/अ (एकूण क्षेत्र ४६८०.१९ चौ.मी. पैकी विंग A चे बांधकाम पुर्ण झाले असून त्याचे क्षेत्र २५२१.०० चौ.मी.) मधील बांधकाम नकाशात दर्शविलेल्या तळघर (Basement) मधील जागेत विविध स्वरुपाचे वापर दर्शविले आहे. (उदा. स्टोअर, एसी उपकरणे इ. ) सबब, सदरची तळघर (Basement) मधील जागा ही भविष्यात जमीन मालकास विकता (Non-Saleable) येणार नाही.**

७) सहायक संचालक, नगर रचना, जळगाव यांनी सदर बांधकाम परवानगीसाठी वाढीव बांधकाम क्षेत्राचे **अधिमुल्य** रुपये रुपये २,६२,०००/-चलन क्र. MH-006431832, दि. २४.०९.२०१८ व सदर बांधकाम परवानगीसाठी **विकास शुल्क** रुपये २,३८,६१०/- चलन क्र. MH-006432476, दि. २४.०९.२०१८ अन्वये वसूल करण्यात आलेले आहेत.

सबब उपरोक्त तपशीलामध्ये नमूद रहिवास वापराचे इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**( मनोहर भागवं)**
**सहायक संचालक**
**नगर रचना, जळगाव**

**उपविभागीय अधिकारी,**
**जळगाव भाग, जळगाव.**

प्रत - १) सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा.
२) मे. चंद्रा कन्स्ट्रक्शन चे भागीदार श्री. मुकेश शांतीलाल ललवाणी, रा. प्लॉट नं. ७१/४ चंद्रम , लेक सिटी लेन नं. ३, शिरसोली रोड, जळगाव यांना माहितीसाठी.
ता. चाळीसगाव, जि. जळगाव यांना माहितीसाठी.
३) तलाठी / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सावखेडा बु., ता. जळगाव, जि. जळगाव यांना माहितीसाठी व कर आकारणी करीता रवाना.

विसपुते/०७०३१९.